ग्रामीण कृषी मौसम सेवा
भारत मौसम विभाग
केंद्रीय कापूस संशोधन संस्था
नागपूर

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 09-12-2022

नागपूर(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2022-12-09 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2022-12-10 | 2022-12-11 | 2022-12-12 | 2022-12-13 | 2022-12-14 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 1.2 | 3.3 | 2.8 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 27.6 | 27.8 | 27.3 | 27.7 | 28.0 |
| किमान तापमान (अं.से) | 9.7 | 10.6 | 11.3 | 11.8 | 12.2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 66 | 63 | 60 | 61 | 64 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 45 | 43 | 41 | 43 | 44 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 3.0 | 3.0 | 3.0 | 3.0 | 2.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 36 | 54 | 47 | 46 | 38 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 4 | 5 | 6 | 5 | 6 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• नागपुर जिल्ह्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या जिल्हास्तरीय अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक०९ ते १३ डिसेंबर,२०२२ दरम्यान आकाश आंशिक ते अंशतः ढगाळ राहण्याची अधिक शक्यता, • दिनांक १०, ११ व १२ डिसेंबर २०२२ रोजी तुरळक ठिकाणी अति हलक्या ते हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

• पावसाचा अंदाज लक्षात घेता कापूस पिक पिकाची बोंडे फुटून कापूस बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे तेथे शेतकरी बांधवांनी कपाशीच्या वेचनीच्या कामाला प्राधान्य द्यावे. वाणानुसार वेचणी केलेला कापूस कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावा. कापूस वेचणी व साठवणुकीसाठी व पुढील संक्रमणाचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक/गोणपाटाच्या पिशविऐवजी कॉटन पिशव्याचा वापर करावा. • परिपक्व अवस्थेतील धान पिकाची काढणी तात्काळ करावी.धान पिकाची कापणी झाली असल्यास व शेतमाल उघड्यावर ठेवला असल्यास प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा.धान कापणी झाली असल्यास व शेतमाल शेतात पसरून ठेवला असल्यास एकत्र गोळा करून प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

• पावसाचा अंदाज लक्षात घेता परिपक्व अवस्थेतील कापसाची वेचणी करावी तसेच काढणी केलेला धान पिक शेतमाल प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हरभरा | • वाफसा अवस्थेत हरभरा पिक२० ते ३० दिवसाच्या अवस्थेत असताना पाणी व अन्नद्रव्यासाठी पिकाची तनासोबत स्पर्धा टाळण्यासाठी दोन वेळा खुरपणी व कोळपणी करावी. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| गहू | • गहू पिकास पेरणीनंतर १८ ते २० दिवसानंतर मुकुट मुळे फुटण्याच्या अवस्थेत पहिले पाणी द्यावे. या अवस्थेत पाण्याचा ताण बसल्यास ३३ टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते. बागायती उशिरा गहू पेरणीसाठी प्रती हेक्टरी १५० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे. गहू पिकाच्या एचडी २१८९ किंवा पूर्णा यासारख्या जाड दाण्यांच्या वाणांसाठी बियाणे दर प्रती हेक्टरी १२५ किलो वापरावे. बागायती उशिरा पेरणीसाठी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश या प्रमाणात रासायनिक खतांची मात्रा द्यावी. बागायती वेळेवर आणि उशिरा या दोन्ही पेरणीसाठी नत्राची अर्धी मात्रा तसेच संपूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळी द्यावे व उरलेली नत्राची अर्धी मात्रा पहिल्या पाण्याचे पाळीच्या वेळी (१८ ते २० दिवसानंतर) द्यावी. • गहू पिकास मर्यादित सिंचनाची उपलब्धता लक्षात ठेऊन, एकाच ओलिताची व्यवस्था असल्यास पेरणीनंतर ४२ दिवसांनी, दोन ओलिताची व्यवस्था असल्यास २१ व ६५ दिवसांनी व तीन ओलिताची व्यवस्था असल्यास २१, ४२आणि ६५ दिवसांनी ओलीत करावे. |
| तूर | • तूर पिकाला कळ्या आणि फुले लागताच कीड व्यवस्थापनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ५ टक्के निंबोळी अर्क अॅआझाडीराक्टिन ३०० पीपीएम ५० मिली अधिक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाने खाणाऱ्या अळीच्या निरीक्षणासाठी हेक्टरी ५ फेरोमेन सापळे ५० मी. अंतरावर लावावे. |
| मोहरी | • वाफसा अवस्थेत मोहरी पिकामध्ये पेरनीनंतर २० व ४० दिवसा नंतर २ निंदन व २ डवरणी करावी. |
| कपाशी | • ज्या भागात कापूस पिक पिकाची बोंडे फुटून कापूस बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे तेथे शेतकरी बांधवांनी कपाशीच्या वेचनीच्या कामाला प्राधान्य द्यावे. वाणानुसार वेचणी केलेला कापूस कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावा. कापूस वेचणी व साठवणुकीसाठी व पुढील संक्रमणाचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक/गोणपाटाच्या पिशविऐवजी कॉटन पिशव्याचा वापर करावा. |
| भात | • परिपक्व अवस्थेतील धान पिकाची काढणी तात्काळ करावी. • धान पिकाची कापणी झाली असल्यास व शेतमाल उघड्यावर ठेवला असल्यास प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा. • धान कापणी झाली असल्यास व शेतमाल शेतात पसरून ठेवला असल्यास एकत्र गोळा करून प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| अळशी | • वाफसा अवस्थेमध्ये, जवस पिकास पेरनीनंतर २५ पहिली डवरणी करावी, तसेच तणांचा प्रादुर्भाव लक्षात घेता निंदनी करावी. |
| टोमॅटो | • मागील आठवड्यातील ढगाळ हवामानामुळे टोमॅटो पिकावर उशिरा येणाऱ्या करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी स्वच्छ हवामन परिस्थिती असताना कॉपर ऑक्सिक्लोराईड (३.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मॅन्कोझेब (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा बोर्डो मिश्रण (१ %) किंवा कॉपर हायड्रॉक्साईड (२.० ग्रॅम/लि.) किंवा फोसेटील एएल ( ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा डायमिथोमोर्फ (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा पुर्वमिश्रित बुरशीनाशक पायराक्लोस्ट्रोबिन + मेटीराम (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मेफेनोक्झाम + कॉपर ऑक्सिक्लोराईड (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मेटालीक्सील ८ % + मॅन्कोझेब ६४ % (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) या प्रमाणातफवारणी करावी. |
| वांगे | • वांग्याच्या पिकावर फळे व शेंडा पोखरणाऱ्या अळीचा रादुर्भाव दिसून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास कार्बोसल्फान २५ % ईसी १२५० मिली प्रति हेक्टर किंवाडेल्टामेथ्रिन ०२.८० % ईसी ४०० ते ५०० मिली प्रति हेक्टर किंवाइमामेक्टिन बेंझोएट ०५ % एसजी २०० ग्रॅम प्रति हेक्टर किंवालॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.९० % सीएस ३०० मिली प्रति हेक्टर किंवास्पिनोसॅड ४५ % एससी १६२ ते १८७ मिली प्रति हेक्टर किंवाथियाक्लोप्रिड २१.७० % एससी ७५० मिली प्रति हेक्टर किंवाक्लोरॅंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी २०० मिली प्रति हेक्टर या प्रमाणात ५०० लिटर पाण्यात मिसळून कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. |
| मिरची | • तापमानातील चढ उतार व उच्च आद्रतेमुळे मिरची पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी हेक्साकोनाझोल ७५ % डब्ल्यूजी६६.७ ग्राम ग्रॅम किंवा टेब्युकोनाझोल २५ % डब्ल्यूजी @ ५००-७५० ग्रॅम किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन ८.३ % + मॅन्कोझेब ६६.७ % डब्ल्यूजी @ १५०० ग्रॅम किंवा बोस्कालीड २५.२ % + पायराक्लोस्ट्रोबिन १२.८ % डब्ल्यूजी @ ६०० ग्राम किंवा कार्बेन्डाझिम १२ % + मॅन्कोझेब ६३ % डब्ल्यूजी @ ७५० ग्रॅम किंवा क्रेसॉक्सिम - मिथाइल १५ % + क्लोरोथॅलोनिल ५६ % डब्ल्यूजी @ १००० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल १० % डब्ल्यूपी + सल्फर ६५ % डब्ल्यूजी @ १२५० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल ५० % + ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन २५ % डब्ल्यूजी @ २५० ग्राम प्रती हेक्टर ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून या पैकी कोणत्याही एका बुरशी नाशकाची स्वच्छ हवामन परिस्थिती असताना फवारणी करावी. |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • परिपक्व अवस्थेतील बाजारायोग्य आंबिया बहारातील फळांची काढणी पावसाचा अंदाज लक्षात घेता करावी. |

**पशुधन विषयक निहाय सल्ला:**

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी रात्रीच्या वेळी जनावरांना गोठ्यामध्ये/सुरक्षित ठिकाणी ठेवावे. जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी ४ ते ६ इंच जाडीचे भाताचा पेंढा, गव्हाचा पेंढा, करावातीचे धूळ इत्यादीचे बेडिंग करावे. जनावरांच्या गोठ्याचा व जमिनीचा भाग कोरडा व स्वच्छ ठेवावा. जनावरांना पिण्यासाठी २४ तास स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी. जनावरांच्या पाण्याची कुंड/साधने याची आठवड्यातून एकदा स्वच्छता करावी. उत्पादकता व प्रजनन वाढीच्या दृष्टीने जनावरांना दररोज ३० ते ४० ग्राम मिनरल मिक्श्चर द्यावे. |

**मासेमारी निहाय सल्ला:**

| मासेमारी | मासेमारी निहाय सल्ला |
|---|---|
| स्वीट वॉटर फिश | • थंडी मध्ये मास्यांची पचन संस्था आकसली जाते व खाण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे थंडीमध्ये खाद्याचे प्रमाण ५० ते ७५ टक्के कमी करावे हिवाळ्यामध्ये तळ्यातील वरच्या पाण्याचे तापमान कमी होते त्यामुळे मासे तळास राहणे पसंत करतात यासाठी पाण्याची पातळी सहा ते सात फूट ठेवावी.हिवाळ्यामध्ये सूर्यप्रकाशाची तीव्रता व कालावधी कमी होते व प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावल्याने पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण कमी होते यासाठी पाणी बदलून किंवा हवा सोडून पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण योग्य राखावे. |

**इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:**

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |